# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (क) व (ड) च्या
**{स्थावर विभाग}** तरतुदीनुसार नागपूर महानगरपालिका मालकीच्या मौजा- भांडेवाडी, ख.क्र. १०२ (भाग), ११३ (भाग), ११४ (भाग), ११५ (भाग) येथील ९.०० एकर जागा एकात्मिक घनकचरा प्रक्रिया सुविधा उभारण्यासाठी नियुक्ती ऐजंन्सी M/s. SusBDe LOC Nagpur Private Limited यांना २ वर्षाच्या भाडेपट्टयावर देणेबाबत विषयांकित जागेचा ताबा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाकडे देण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेणेचा प्रश्न विचारात घेणे.

सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागानी मौजा- भांडेवाडी, ख.क्र. १०२ (भाग), ११३ (भाग), ११४ (भाग), ११५ (भाग) येथील ९.०० एकर जागा एकात्मिक घनकचरा प्रक्रिया सुविधा उभारण्यासाठी नियुक्ती ऐजंन्सी M/s. SusBDe LOC Nagpur Private Limited व सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांच्या प्रस्तावित करारनाम्यातील अट क्र. ४.१.२ (a), ४.१.३ (f) व १०.१ नुसार नागपूर महानगरपालिकेला जागा उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त असल्याने जागा २ वर्षाकरीता देणेकरीता जागेचा ताबा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागास देण्याबाबत ची नस्ती दि. ६ एप्रिल २०२३ ला स्थावर विभागाकडे प्राप्त झाली आहे.

सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाने खालील तपशीलात नमूद जागेची मागणी केली आहे.

- मौजा-भांडेवाडी
- खसरा क्र. :- ख.क्र. १०२ (भाग), ११३ (भाग), ११४ (भाग), ११५ (भाग)
- आरक्षण - Compost Depot
- क्षेत्रफळ - ९.०० एकर/ ३६,४२१.७ चौ. मी.
- गांव नमुना सांत मध्ये महानगरपालिका, नागपूर चे नावाची नोंद आहे.

मौजा- वाठोडा व भांडेवाडी, (क्षेत्र १०६.३९ हेक्टर आर) येथील जागा विविध प्रयोजनासाठी आरक्षित करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (२) अन्वये उक्त खसरा क्रमांकाना Compost Depot क्षेत्रफळ ९.०० एकर शासनाची मंजुरी प्राप्त आहे.

महानगरपालिकेच्या मालकीच्या जमीनीचा विनीयोग करावयाचा असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (क) व (ड) मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार **७९** (क) मध्ये आयुक्तांस महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकिची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल भाडयाने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल. **७९** (ड) जो मोबदला घेऊन महानगरपालिकेच्या मालकिची कोणतीही मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्टयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतरीत करता येईल तो मोबदला असे अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालु बाजार भाव किंमतीपेक्षा कमी असता कामा नये असे नमुद आहे.

मनपा ठराव क्र. २९९ दि. २०.१०.२०१८ अन्वये निहित केलेल्या धोरणानुसार नागपूर महानगरपालिकांनी भाडेपट्टयावर दिलेल्या जागेकरीता भुभाडे आकारण्यात येते.

त्यानुसार मनपा ठराव क्र. २९९ दि. २०.१०.२०१८ अन्वये निहित केलेल्या धोरणानुसार
जागेचे क्षेत्रफळ **x** शिघ्रसिध्द गणक कर = जागेचे मुल्य
९.०० एकर/३६४२१.७ चौ.मी. **x** रू. १,३५०/- चौ.मी.
जागेचे मुल्य = रू. ४,९१,६९,२९५/-
येणाऱ्या मुल्यावर **२ %** प्रमाणे ग्राऊंड रेंट = रू. ९,८३,३८६/- (प्रति वर्ष)

M/s. SusBDe LOC Nagpur Private Limited व सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांचे मध्ये झालेल्या करारनाम्यातील अट क्र. ४.१.२ (a), ४.१.३ (f) व १०.१ अन्वये नागपूर महानगरपालिकाव्दारा सदर प्रकल्पाकरीता जागा देणे अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने स्थावर विभागाव्दारा

म.न.पा च्या सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागास २ वर्षाकरीता जागा हस्तांतरीत करण्याचा व M/s. SusBDe LOC Nagpur Private Limited व्दारा सदर जागेचा होत असलेल्या वापराच्या अनुषंगाने वापर शुल्क म्हणून ठराव क्र. २९९ दि. २०.१०.२०१८ प्रमाणे येणा-या भुभाडे इतकी रक्कम वापर शुल्क म्हणून आकारण्याचा प्रश्न विचारात घेणे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 347/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 13/04/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (मालमत्ता), स्थावर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (क) व (ड) च्या तरतुदीनुसार नागपूर महानगरपालिका मालकीच्या मौजा- भांडेवाडी, ख.क्र. १०२ (भाग), ११३ (भाग), ११४ (भाग), ११५ (भाग) येथील ९.०० एकर जागा एकात्मिक घनकचरा प्रक्रिया सुविधा उभारण्यासाठी नियुक्ती ऐजंन्सी M/s. SusBDe LOC Nagpur Private Limited यांना २ वर्षाच्या भाडेपट्टयावर देणेबाबत विषयांकित जागेचा ताबा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाकडे देण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेणेचा प्रश्न विचारात घेऊन,

सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागानी मौजा- भांडेवाडी, ख.क्र. १०२ (भाग), ११३ (भाग), ११४ (भाग), ११५ (भाग) येथील ९.०० एकर जागा एकात्मिक घनकचरा प्रक्रिया सुविधा उभारण्यासाठी नियुक्ती ऐजंन्सी M/s. SusBDe LOC Nagpur Private Limited व सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांच्या प्रस्तावित करारनाम्यातील अट क्र. ४.१.२ (a), ४.१.३ (f) व १०.१ नुसार नागपूर महानगरपालिकेला जागा उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त असल्याने जागा २ वर्षाकरीता देणेकरीता जागेचा ताबा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागास देण्याबाबत ची नस्ती दि. ६ एप्रिल २०२३ ला स्थावर विभागाकडे प्राप्त झाली आहे.

सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाने खालील तपशीलात नमूद जागेची मागणी केली आहे.

- मौजा-भांडेवाडी
- खसरा क्र. :- ख.क्र. १०२ (भाग), ११३ (भाग), ११४ (भाग), ११५ (भाग)
- आरक्षण - Compost Depot
- क्षेत्रफळ - ९.०० एकर/ ३६,४२१.७ चौ. मी.
- गांव नमुना सांत मध्ये महानगरपालिका, नागपूर चे नावाची नोंद आहे.

मौजा- वाठोडा व भांडेवाडी, (क्षेत्र १०६.३९ हेक्टर आर) येथील जागा विविध प्रयोजनासाठी आरक्षित करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (२) अन्वये उक्त खसरा क्रमांकाना Compost Depot क्षेत्रफळ ९.०० एकर शासनाची मंजुरी प्राप्त आहे.

महानगरपालिकेच्या मालकीच्या जमीनीचा विनीयोग करावयाचा असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (क) व (ड) मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार ७९ (क) मध्ये आयुक्तांस महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकिची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल भाडयाने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल.

७९ (ड) जो मोबदला घेऊन महानगरपालिकेच्या मालकिची कोणतीही मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्टयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतरीत करता येईल तो मोबदला असे अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालु बाजार भाव किंमतीपेक्षा कमी असता कामा नये असे नमुद आहे.

मनपा ठराव क्र. २९९ दि. २०.१०.२०१८ अन्वये निहित केलेल्या धोरणानुसार नागपूर महानगरपालिकांनी भाडेपट्टयावर दिलेल्या जागेकरीता भुभाडे आकारण्यात येते.

त्यानुसार मनपा ठराव क्र. २९९ दि. २०.१०.२०१८ अन्वये निहित केलेल्या धोरणानुसार

जागेचे क्षेत्रफळ **x** शिघ्रसिध्द गणक कर = जागेचे मुल्य

९.०० एकर/३६४२१.७ चौ.मी. **x** रू. १,३५०/- चौ.मी.

जागेचे मुल्य = रू. ४,९१,६९,२९५/-

येणाऱ्या मुल्यावर **२ %** प्रमाणे ग्राऊंड रेंट = रू. ९,८३,३८६/- (प्रति वर्ष)

M/s. SusBDe LOC Nagpur Private Limited व सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांचे मध्ये झालेल्या करारनाम्यातील अट क्र. ४.१.२ (a), ४.१.३ (f) व १०.१ अन्वये नागपूर महानगरपालिकाव्दारा सदर प्रकल्पाकरीता जागा देणे अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने स्थावर विभागाव्दारा म.न.पा च्या सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागास २ वर्षाकरीता जागा हस्तांतरीत करण्याचा व M/s. SusBDe LOC Nagpur Private Limited व्दारा सदर जागेचा होत असलेल्या वापराच्या अनुषंगाने वापर शुल्क म्हणून ठराव क्र. २९९ दि. २०.१०.२०१८ प्रमाणे येणा-या भुभाडे इतकी रक्कम वापर शुल्क म्हणून आकारण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**